# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## ➢ वसुंधरा महोत्सव व डीप क्लीन ड्राईव्ह अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करणाऱ्यांचे मा. आयुक्त यांच्या हस्ते सन्मान

दिनांक ०४ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते वसुंधरा महोत्सव व डीप क्लीन ड्राईव्ह या मोहिमेअंतर्गत सहभागी झालेले सर्व सामाजिक संस्था, महाविद्यालय, शाळा, एनएसएस व महिला बचत गट यांचा सन्मान करण्यात आला.

माझी वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षण या अभियानांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी अनेक स्तुत्य उपक्रम राबविले आहेत. त्या उपक्रमांच्या आधारे मिरा भाईंदर महानगरपालिकेस अनेक पुरस्कार देखील प्राप्त झाले आहेत. यावर्षी सुद्धा मिरा भाईंदर महानगरपालिकेने माझी वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षण या अभियानांतर्गत विविध स्तुत्य उपक्रम राबविले. यामध्ये नागरिकांचा सहभाग, सामाजिक संस्थांचा सहभाग, शाळा महाविद्यालय, एन.एस.एस. व बचत गट या सर्वांचा सहभाग लाभल्याने हे सर्व उपक्रम यशस्वीरित्या पार पडले आहेत. याचा एक भाग म्हणून मा. आयुक्त यांच्या संकल्पनेतून महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक अभियानातील विशेष मोहिमेत सहभागी होणाऱ्या या सर्व उपस्थितांचा सन्मान करण्यात आला. मिरा भाईंदर शहराला उच्च दर्जा मिळवून देण्यासाठी व शहरातील स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत विशेष दक्ष राहणाऱ्या या नागरिकांचा सन्मान हा आवश्यक असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले. स्वतःच्या घरातील स्वच्छता त्याचबरोबर शहराच्या स्वच्छते मोहिमेत योगदान देणाऱ्या या सर्व उपस्थितांचे सर्व स्तरावर कौतुक करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे असे देखील मा. आयुक्त यांनी याठिकाणी आपले मत व्यक्त केले. यापुढे देखील मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक विशेष मोहिमेत असाच उत्स्फूर्त सहभाग व सहकार्य सर्व नागरिक व सर्व सामाजिक संस्था शाळा महाविद्यालय या सर्वांकडून अपेक्षित असल्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी याठिकाणी नमूद करून सर्वांचे आभार व्यक्त केले.